दिनांक : १५/०९/२०२५

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे,
*मॉडर्न कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,शिवाजीनगर, पुणे -५*

# *शिष्यवृत्ती सूचना*

## *कनिष्ठ महाविद्यालय (Junior College)*

## *(फक्त SC, ST, OBC, NT- A,B,C,D. , SBC या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी)*

## *कृपया सर्व सूचना पूर्ण वाचल्यानंतरच शिष्यवृत्ती / फ्रिशिप अर्ज भरणे बंधनकारक आहे*

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये MAHADBT प्रणालीमध्ये शिष्यवृत्ती योजना सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सुरु झालेली आहे. SC, ST, NT-A,B,C,D, OBC & SBC या संवर्गातून महाविद्यालयात ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. त्या सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी शासनाने विहित केलेल्या नमून्यातील शिष्यवृत्ती किंवा फ्रिशिप चा ऑनलाईन अर्ज खालील वेबसाईटवर भरणे बंधनकारक आहे.

# https://mahadbtmahait.gov.in

पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती किंवा फ्रिशिप चा अर्ज ऑनलाईन भरुन योग्य ती आवश्यक प्रमाणपत्रे अपलोड करुन https://mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईनच महाविद्यालय Verification करण्याकरिता **दि. ३१.१०.२०२५ पर्यंत पाठवावेत आणि हार्ड कॉपी दि. ६ नोव्हें, २०२५ पर्यंत ११.०० ते ३.०० या वेळेत महाविद्यालयाच्या कार्यालयात शिष्यवृत्ती विभागात जमा करावेत.**

तसेच ज्या विद्यार्थ्यांना त्यांचे अर्ज दुरुस्तीसाठी विद्यार्थी लॉगीनला परत पाठविलेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी – My Applied Scheme मध्ये जाऊन Application ID ला डबल क्लिक केले की, अर्जामध्ये काय चुकले आहे ते दिसते. यात दिसलेली Query Solve करुन पुन्हा Reaply केले तरच

ऑनलाईन अर्जाची Process पूर्ण होते याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.हे सर्व प्रोसेस पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी ही विद्यार्थ्याची आहे.

१) शिष्यवृत्ती किंवा फ्रिशिप चा ऑनलाईन अर्ज भरताना **आधार बेसनेच** भरणे बंधनकारक आहे.

२) शिष्यवृत्ती किंवा फ्रिशिपचा ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी आधार कार्डला विद्यार्थ्याचा मोबाईल नंबर व विद्यार्थ्याचे बँक खाते लिंक असणे आवश्यक आहे तसेच NPCI पोर्टलला लिंक असणे आवश्यक आहे.त्याशिवाय शिष्यवृत्ती किंवा फ्रिशिप लाभाची रक्कम विद्यार्थ्याच्या खात्यावर जमा होणार नाही. तसेच महाविद्यालयाच्या खात्यावरही जमा होणार नाही .याची कृपया सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

३) शिष्यवृत्ती किंवा फ्रिशिप चा अर्ज भरताना https://mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर लॉगीन करुन त्यातील प्रोफाईलमधील सहा टॅब – १) Personal Information २) Address Information ३) Other Information ४) Current Course ५) Past Qualification ६) Hostel Details व्यवस्थित व अचूक भरणे आवशयक आहे.

४) सर्व शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना असे सूचित करण्यात येते की, ऑनलाईन रजिस्ट्रेशन करताना स्वतःचा मोबाईल नं. द्यावा मोबाईल नं.पालकांचा देऊ नये MAHADBT या वेबसाईटवरचे सर्व SMS रजिष्टर केलेल्या मोबाईल नं. ला येतात.

५) विद्यार्थ्यांने मोबाईल नं. बदलला आणि शिष्यवृत्ती किंवा फ्रिशिपचे पैसे त्यांच्या बँक खात्यावर जमा झाले नाहीत तर त्याला सदर विद्यार्थी जबाबदार राहिल याची कृपया सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

६) जो विद्यार्थी शिष्यवृत्ती किंवा फ्रिशिप चा अर्ज MAHADBT या वेबसाईटवर पहिल्यांदाच भरत असेल अशा विद्यार्थ्यांनी New Registration केल्यानंतर User व Password मिळतो. हा User व Password टाकून प्रोफाईल भरुन शिष्यवृत्ती किंवा फ्रिशिप चा अर्ज ऑनलाईन भरुन विद्यार्थ्यांनी मागील वर्ष Complete व चालू वर्ष Pursuing करणे आवश्यक आहे. प्रोफाईलमध्ये ज्या ठिकाणी Fees Paid आहे त्या ठिकाणी No करावे व शिक्षण शुल्क ०० (झिरो) करावे.

७) विद्यार्थी हा इयत्ता १२वी चा असेल तर अशा विद्यार्थ्यांनी मागील वर्ष Complete व चालू वर्ष Pursuing करणे आवश्यक आहे. प्रोफाईल पुन्हा भरण्याची गरज नाही. प्रोफाईलमध्ये ज्या ठिकाणी Fees Paid **आहे त्या ठिकाणी No करावे व शिक्षण शुल्क ०० (झिरो) करावे.**

८) विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती किंवा फ्रिशिपचा ऑनलाईन अर्ज भरताना मागील वर्षातील परीक्षेचे गुण भरताना टक्केवारीमध्ये भरणे आवश्यक आहे.

९) ज्या विद्यार्थ्यांकडे आईचा उत्पन्नाचा दाखला असेल त्या विद्यार्थ्यांनी वडिलांचे Reason आईच्या उत्पन्नाच्या दाखल्याबरोबर अपलोड करावे.

१०) Declaration Form हा विद्यार्थ्यांच्या लॉगीनलाच असतो तो डाऊनलोड करुन भरुन वेबसाईडवर अपलोड करावा.

११) शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना महाविद्यालय व शासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेले सर्व SMS विद्यार्थ्यांनी आपल्या मोबाईलवर जतन करुन ठेवणे बंधनकारक आहे. तसेच विद्यार्थ्यांनी MAHADBT पोर्टलवरील निर्गमित झालेले पेमेंट व्हाउचर विद्यार्थी लॉगीन मध्ये जाऊन त्वरित Redeem करावेत. यासाठी विद्यार्थ्यांनी आपला युजर आयडी व पासवर्ड जतन करुन ठेवणे बंधनकारक आहे.

१२) शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न आहेत की, नाही याची पडताळणी / खातरजमा आधार पोर्टल https://resident.uidai.gov.in/bank-mapper या लिंक वरती जाऊन करावी. तसेच आधार ॲक्टिव आहे किंवा नाही याबाबत देखील सदर पोर्टलवरुन खातरजमा करावी.

१३) जे विद्यार्थी मुदतीत अर्ज सादर करणार नाहीत त्यांना शासनाकडून शुल्क प्राप्ती होणार नाही व त्यांना उर्वरित शैक्षणिक शुल्काची रक्कम महाविद्यालयात भरणे बंधनकारक राहिल याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

१४) *ज्या विद्यार्थ्यांना इयत्ता १०वी मध्ये ७५% पेक्षा जास्त टक्के आहेत अशा विद्यार्थ्यांनी Post Matric Scholarship अर्जाबरोबर Rjarshee Shahu Merit Scholarship चा ही अर्ज भरणे आवश्यक आहे. SC, NT, SBC याच Category च्या विद्यार्थ्यांनाच Rjarshee Shahu Merit Scholarship भरता येईल.*

१५) ज्या विद्यार्थ्याच्या Admission Challan वर Category चा उल्लेख (उदा. SC Scholarship, SC Freeship, ST Scholarship, ST Freeship, OBC Scholarship, OBC Freeship, NT Scholarship, NT Freeship, SBC Scholarship, SBC Freeship) **असेल व विद्यार्थ्यांनी** Category **चे** Concession **घेतलेले आहे**. अशा सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अथवा फ्रिशिप चा अर्ज MAHADBT या वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने भरणे आवश्यक व बंधनकारक आहे. अन्यथा त्यांना उर्वरित शैक्षणिक शुल्काची रक्कम महाविद्यालयात भरणे बंधनकारक राहिल.

१६) Scholarship अर्ज भरताना Income नुसार Scheme Choice करावी लागते. यासंबधीची माहिती नोटीस फलकावर लावलेली आहे.

## ऑनलाईन अर्जाबरोबर खालील कागदपत्रे जोडावीत –

१) इयत्ता १०वी आणि इयत्ता १२वी च्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत.

२) वडिलांचा वित्तीय वर्ष २०२३-२४ चा उत्पन्नाचा दाखला

(**तहसिलदार** यांनी दिलेले प्रमाणपत्र)

३) **तहसीलदार** किंवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

४) जातीचे प्रमाणपत्र (**तहसिलदार** यांनी दिलेले प्रमाणपत्र)

५) शिक्षणात खंड पडला असेल तर सक्षम अधिकाऱ्याने दिलेले गॅप प्रमाणपत्र.

६) आधारकार्डाची साक्षांकित प्रत.

७) विद्यार्थ्याचे आधार कार्ड लिंक करुन घेऊन लिंक केल्याची प्रत

जोडणे आवश्यक

१०) प्रवेश घेतलेल्या चलनाची साक्षांकित प्रत.

११) विद्यार्थ्याच्या बँक पासबुकची साक्षांकित प्रत.

१२) प्रथम वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी तसेच नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांनी (L.C./T.C.) ची साक्षांकित प्रत.

१३) शिधापत्रिका (रेशनकार्ड) ची साक्षांकित प्रत.

१४) प्रत्येक विद्यार्थ्याने हजेरी पत्रक (Attendance) चे ७५ % असल्याचे प्रमाणपत्र

१५) NPCI (National Payments Corporation of India) या पोर्टलला लिंक असणे आवश्यक आहे.

# अंतिम दिनांक : दि. ३१/१०/२०२५

Registrar
P. E. Society's
Modern College of Arts, Science & Commerce
Shivajinagar, Pune - 411005.

Principal
P. E. Society's
Modern College of Arts, Science & Commerce
Shivajinagar, Pune - 411005.